# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४७ वी बैठक दिनांक २७ एप्रिल २००६

# ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४७ वी बैठक दि. २७.४.२००६ रोजी जलसंपदा विभागाचे सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४७/१**

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४६ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

**ठराव क्र. ४७/२**

महामंडळाची आर्थिक स्थिती हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत ठराव करण्यांत आलेला नाही.

**ठराव क्र. ४७/३**

"ठराव करण्यात येतो की, सन २००३-०४ चा आठवा वार्षिक अहवाल व स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल व त्याचे अनुपालन यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच हे अहवाल शासनामार्फत विधी मंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

**ठराव क्र. ४७/४**

"ठराव करण्यात येतो की, दुर्गाजीबाबा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित यांचे नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

**ठराव क्र. ४७/५**

"ठराव करण्यांत येतो की, श्री. प्र. ना. बेहेरे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची महामंडळाचे कायदे सल्लागार म्हणून दि. १.४.२००६ ते ३१.३.२००७ या कालावधीसाठी रु. ८,०००/- प्रतिमाह ठोक एकरकमी सल्ला फी वर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या मान्यतेने केलेल्या नेमणूकीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

ठराव क्र. ४७/६

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अधिपत्याखालील प्रकल्पाचे कामासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या भूसंपादन कायदा कलम १८ खालील जिल्हा न्यायालयात महामंडळाच्या विरोधात निर्णय झालेल्या दाव्यांविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अपिलांना योग्य न्याय मिळावा यासाठी महामंडळातर्फे सॉलिसिटर नेमण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ४७/७

"ठराव करण्यांत येतो की, श्री. सचिन भिमराव जाधव, रा. धनकवडी, पुणे मौजे वडगाव बु., ता. हवेली येथील सर्वे नं. २७,२८ (नवीन गट नं. ६१) मधील नवा मुठा उजवा कालव्या लगतची ८ गुंठे जागा वार्षिक भाडेपट्टयाने मिळणे बाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यांत येत आहे."

ठराव क्र. ४७/८

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा वसाहत सातारा हे ठिकाण खेड ग्रामपंचायत हद्दी मध्ये येत असल्याने सदर वसाहतीमधील मोकळ्या जागा व बांधीव गाळे करिता भाडेपट्टा नियामक मंडळाचे ४६ व्या बैठकीतील ठराव क्र. ४२/६ मधील उपविभागाच्या मुख्यालयाकरीता ठरविण्यात आलेल्या भाडेपट्टा दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ४७/९

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या ताब्यातील कृष्णानगर वसाहती मधील १० फूट × २० फूट आकाराच्या ४० मोकळ्या जागा १-१ वर्षाच्या कराराने ५ वर्ष पर्यंत मुदतवाढ देऊन जाहिर लिलाव पध्दतीने भाडे ठरवून भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ४७/१०

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाचे ताब्यातील मौजे पाटस तालुका दौंड जिल्हा पुणे येथील पाटबंधारे वसाहत (कडा वसाहत ) मधील ट्रेनिंग सेंटर वसाहतीची इमारत क्षेत्रफळ ५५८६ चौ.फूट वार्षिक रुपये १०७२५१/- भाडेपट्टयाने १-१ वर्ष कराराने ५ वर्षाच्या मुदतीकरिता भीमा शैक्षणिक न्यास, पाटस यांना भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

**ठराव क्र. ४७/११**

"ठराव करण्यांत येतो की, प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी संस्थेस फलटण येथील सिटी सर्व्हे नं. ६४६० मधील नियामक मंडळाच्या ठराव क्र. ३९/०५ अनुसार ३० वर्षे मुदतीकरीता भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीचे वार्षिक भाडे रु. ६८,०८५/- कायम ठेऊन यात दरवर्षी १० टक्के ऐवजी ५ टक्के भाडेवाढ इतके आकारण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ४७/१२**

"ठराव करण्यांत येतो की, ग्रामपंचायत बुध, तालुका खटाव यांना जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत नळपाणी पुरवठा योजनेखाली विहिर खोदणेसाठी नेर तलावातील २ आर जागा दुय्यम निबंधक यांचे प्रचलित दरपत्रकाप्रमाणे जमिनीची किंमत व पाणीपट्टी भरण्याच्या अटीवर कायमस्वरुपी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ४७/१३**

"ठराव करण्यांत येतो की, उजनी प्रकल्पासाठी सन १९७६ मध्ये मौजे करकंब उजनी वसाहत येथे तात्पुरत्या स्वरुपात बांधलेली वर्ग ३अ = २० + वर्ग ३ब = १८ + वर्ग ४ (२ खोल्या) = ५ अशी ४३ निवासस्थाने तेथे राहात असलेल्या व मागणी केलेल्या कर्मचारी वर्गास निव्वळ निवासस्थानापोटी रुपये ५९.४८ लक्ष किंमत शासनास एक रकमी भरण्यास व तदनंतर पाणीपट्टी / वीज देयके / देखभाल दुरुस्ती खर्च व इतर असणारे कर संबंधीतास भरावे लागतील व सदर निवासस्थाने त्याना विक्री करता येणार नाहीत. मूळ जागेवर शासनाची मालकी राहील. फक्त इमारत कर्मचाऱ्यांना देण्यांत येईल या अटीच्या अधीन राहून विकत देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ४७/१४**

"ठराव करण्यांत येतो की, मौजे हिंगणे खुर्द ता.हवेली येथील सर्व्हे नं.२३ मधील मामासाहेब मोहोळ ट्रस्टला शैक्षणिक कारणासाठी देण्यात आलेल्या ३२०० चौ.मी.जागेमध्ये संस्थेला संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या पूर्व परवानगीने पक्के बांधकाम करण्यास व ३० वर्षाची मुदत संपल्यावर बांधकाम स्वखर्चाने पाडण्याच्या अटीवर संस्थेबरोबर भाडेपट्टा कराराची मुदत ३० वर्षे करण्यास मान्यता नियामक मंडळाची देण्यात येत आहे."

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळचे विषय

**ठराव क्र. ४७/१५**

"ठराव करण्यांत येतो की, उरमोडी प्रकल्पांतर्गत उच्च न्यायालयीन दावा क्र. २५६८/२००० मधील न्यायालयीन आदेशानुसार जुगाई देवी मंदीर व तीन घरांच्या नुकसान भरपाईची रक्कम

रुपये ३,३६,६८२/- संबंधित खातेदारांना अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ४७/१६

"ठराव करण्यांत येतो की, किटवाड क्र. १ लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातील किटवाड, होसुर, बुक्कीहाळ, कौलगे व काळकुंद्री या पाच गावांना जलाशयातून उपसा सिंचनाद्वारे सिंचनाचा लाभ घेण्यास लाभधारक शेतकरी उपसा सिंचनाचा खर्च सहकारी संस्था स्थापून त्याद्वारे करण्यास व किटवाड क्र. २ या जलाशयातील उर्वरित पाणी ७ को. प. बंधाऱ्याद्वारे उपसा पद्धतीने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४७/१७

" टंचाई निवारण कार्यक्रम टप्पा-१ (रु. १००० कोटी) व टप्पा-२ (रु. ५०० कोटी) अंतर्गत हाती घेतालेल्या कामांची "आर्थिक व भोतिक प्रगती" हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत ठराव करण्यात आला नाही.

| | | |
|---|---|---|
| सही/- | ४ | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | | म.कृ.खो.वि.म. पुणे |